# देवमाणूस......

'नयनांसमोर तर दिसतच नाही,
देवाच्या कंठातले शब्द तर कधी
ऐकू येतच नाहीत,
नाही स्वर्गात, नाही नरकात,
पण एका माणसाच्या हृदयात,
त्याच्या व्यक्तिमत्वात व त्याच्या
गोड शब्दांत .......
आढळतो, दिसतो आणि जाणवतो –
माझा देव!'

ह्या जगात, डोळ्यांसमोर तर ईश्वर दिसतच नाही. प्रत्यक्षात तर कधी प्रकट होतच नाही. पण मग देव ह्या जगात असतो कुठे? प्रत्यक्षात भेटतो कुठे? तो असतो आपल्याच अवतीभवती. माणसाच्या रूपात. कधी मित्र म्हणून तर कधी अकस्मात मदतनीस म्हणून – सदैव आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, आपला एक जिवलग साथी!

दुःखात आपण देवाच्या मूर्तीसमोर आपले मनोगत व्यक्त करतो, आपले अश्रू ढाळून मदत मागतो; पण देव तर अप्रत्यक्षपणे मनुष्यरूपातच आपल्याला साहाय्य करतो. योग्य मार्ग दाखवतो. आपले जीवन घडवतो. आपल्या पाठीमागे कोणीही नसताना, आपल्या चेहऱ्यावर हसू आणणारा व दिलासा देणारा तोच देवमाणूस असतो!

त्याच्या हृदयातल्या प्रेमळपणानेच आपल्याला ती व्यक्ती जवळची वाटते. आपण देवावर जसा विश्वास व भरवसा ठेवतो तसाच विश्वास आपण निःसंकोचपणे त्या व्यक्तीवरही ठेवतो. आपल्या संकटांमध्ये व कठोर प्रसंगांमध्ये, प्रथम जी व्यक्ती आठवते ती हीच असते. मग जग इकडचं-तिकडे जरी झालं (झालं), तरी ही ती व्यक्ती कायमच आपल्याला मदत करायला असतेच.

त्या व्यक्तीच्या सदाचाराने व सद्भावनेमुळेच आपल्याला सदैव ती व्यक्ती आदरणीय वाटते व आपल्याला त्या व्यक्तीबद्दल आपुलकी निर्माण होते. देवाने मला सुद्धा अशाच एका व्यक्तीशी भेट घडवून दिली आहे व त्याबद्दल त्या ईश्वराला माझे मनापासून वंदन व त्या व्यक्तीचे शतशः आभार जी मला मनापासून समजून घेते व मला सदैव आनंदी ठेवते!

x——————x——————x

**- भाग्यश्री प्रभूतेंडोलकर**

(इ. १०वी)